स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विज्ञान विद्याशाखा

अंतर्गत

इतिहास विषयाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संक्षिप्त

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

विषय

अॅड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीचा ऐतिहासिक अभ्यास

संशोधक

गायकवाड गणपत धोंडीबा

जिल्हा परिषद हायस्कुल, माळकौठा

९५२७८८१९०१

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शेटोड साईनाथ नारायण

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर.

ऑगस्ट - २०२१

भारतीय समाज सुधारणेचा आरंभ हा तथागत बुद्धा पासून होतो भगवान बुद्धांनी वैदिक संस्कृतीच्या विरोधात वर्ण विरहीत, अनात्मवादी, निरिश्वरवादी, प्रतीत्यसमुत्पाद, सिद्धांताची मांडणी करून भारतात एक वैचारिक क्रांती घडवून आणली, तेथपासून समाज सुधारणेचा आरंभ झालेला आहे.

तथागत बुद्धांनी समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या सामाजिक मुल्यांची पेरणी केली जन्मतः सारे समान आहेत, कोणी श्रेष्ठ नाही कोणी कनिष्ठ नाही, सर्वांना आपापल्या परीने आपले जीवन व्यतीत करण्याचा अधिकार आहे. कोणी कोणाचा मालक नाही, कोणी कोणाचा गुलाम नाही. अमुक एका जातीत जन्मला म्हणून कोणी उच्च ठरत नाही तसेच अमुक एका जातीत जन्मला म्हणून कोणी नीच ठरत नाही. मनुष्य आपल्या कुशल कर्माने उच्च ठरतो आणि अकुशल कर्माने नीच ठरत असतो, माणसाचे कर्म त्याला उच्च किंवा नीच ठरवितात. तथागताच्या या क्रांतिकारक विचारांनी जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेला प्रचंड हादरे दिले.

तथागताच्या विचारांची पेरणी पुढे सर्व साधुसंतांनी आपल्या लेखनातून समाजमनामध्ये केली. कबीराचे दोहे असोत की संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकारामांचे अभंग असोत या सर्वांनी समाजातील कुप्रथांवर कडाडून हल्ला चढविलेला आहे. गाडगेबाबा तर रूढी-परंपरा व अंधश्रद्धेवर आपल्या कीर्तनातून सतत प्रहार करीत असत . थोडक्यात, मानवी मनाची उत्तम मशागत करण्याचे काम संत साहित्याने केले.

लोकशाही ही भारतासाठी नवीन नाही. शाक्याच्या गणराज्य पद्धतीत भारताच्या संसदीय लोकशाहीची मुळे रुजलेली आहेत. सम्राट चंद्रगुप्तांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्यामुळे भारतात एकछत्री अंमल सुरु झाला. सम्राट अशोकाने बुद्ध विचारांचा वारसा पुढे चालवीत कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणली. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर मात्र पुन्हा छोट्या-छोट्या राज्यांचा उदय झाला, त्या प्रत्येकाने आपापल्या मर्जीप्रमाणे समाजात रूढी, परंपरा, कायदे, दंड विधानाचा अंमल सुरु केला. इस्लामी आक्रमणानंतर

भारतभर विखुरलेल्या छोट्या-छोट्या राज्यांचा पाडाव होऊन इस्लामी सत्तेचा अंमल सुरु झाला. मोहम्मद घौरी पासून खिल्जी, तुघलक आणि बहामणी राज्यापासून आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही नंतर मोगल या सर्वांनी स्थानिक रूढी-परंपरा, जाती-वर्ण व्यवस्था यांना आजिबात हात न लावता आपापल्या राज्यांची धुरा सांभाळली भारतीय समाज व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या भानगडीत ते पडले नसल्यामुळे त्यांना फारसा विरोध झाला नाही. राजा केंद्रबिंदू समजून राज्यकारभार पहिला जात असल्याने सामान्य माणसाला इथे स्थान नव्हते, “राजा बोले दळ हाले” अशी अवस्था होती.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांनी रयतेचे राज्य स्थापन करून मानव केंद्रित राजकारण सुरु केले. प्रजेच्या सुखदुःखात सहभागी होऊन बहिष्कृतांच्या बाहुबलावर मानव केंद्रित लोककल्याणकारी राज्याची पायवाट आरंभिली समाजातील रूढी-परंपरांना छेद देऊन राज्यकारभार आरंभिल्यामुळे महाराजांना स्वकीयांचा विरोध पत्करावा लागला.

ब्रिटीश काळात इंग्रजांबरोबर तेथील विविध कल्याणकारी योजना भारतात आल्या. त्यात सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वांसाठी शिक्षण हे धोरण होय. भारतात फक्त विशिष्ट वर्गालाच शिक्षण घेण्याची मुभा होती. एक प्रकारे शिक्षणावर एकजात मक्तेदारी होती. इंग्रजांनी ती मक्तेदारी मोडीत काढून सर्व जातीधर्मातील मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली आणि उपेक्षित, वंचित, बहिष्कृत समाज शिकू लागला.

एका महात्मा फुलेंच्या शिकण्याने नव्या क्रांती पर्वाचा आरंभ झाला. समाजातील वाईट रूढी-परंपरांवर प्रचंड आघात करून अनेक अमानवी प्रथा बंद करण्यासाठी इंग्रजांनी अनेक कायदे केले. दळणवळणाच्या माध्यमांमुळे भारतीयांचा बाह्य जगताशी संपर्क आला इंग्रजांच्या एकछत्री प्रशासनात राजकारणाला वेगळी दिशा देण्यात आली, त्यामुळे तेथील समाज व्यवस्था व राज्यव्यवस्थेची ओळख भारतीयांना झाली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांकडून भातीयांकडे सत्तेचे हस्तांतरण झाले आणि एका नव्या युगाची सुरुवात झाली. स्वतंत्र भारताची राज्यव्यवस्था सुव्यवस्थित चालविण्यासाठी संविधान सभेची निर्मिती होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे आधुनिक भारताच्या उभारणीसाठी संविधान निर्मितीचे

कार्य देण्यात आले. तथागत बुद्धाच्या शिकवणूकीतील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्यायावर आधारित नवे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केले. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून मानवी मूल्याची जोपासना करणारे नवे संविधान आधुनिक भारताच्या जडणघडणीसाठी मोलाचे ठरले आहे.

१९८० पासून ॲड. प्रकाशराव उर्फ बाळासाहेबांचा राजकारणात प्रवेश झाला, त्यांनी दलित राजकारणाला पुनर्जीवित करण्याचा प्रयत्न केला. १९८७ च्या नांदेड लोकसभा पोट निवडणुकीपासून ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचा विशेष राजकीय प्रवास सुरु होतो. प्रस्थापितांच्या विरुद्ध बाळासाहेबांनी पुकारलेले हे एक बंडच होते. संपूर्ण भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार एका बाजूला तर मा. शरद जोशी आणि इतर सर्व पुरोगामी विचारसरणीच्या पक्षांची एकत्रित मोट बांधून बाळासाहेब आंबेडकर दुसऱ्या बाजूला तुल्यबळ लढत दिली. बालासाहेब आंबेडकर हेच बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय वारसदार म्हणून भारतभर सक्रीय झाले. पुन्हा दलित ऐक्याची हवा सुरु झाली. रा. सु. गवई, प्रा. जोगेंद्र कवाडे, राजा ढाले, रामदास आठवले या सर्वांना सोबत घेऊन १९८९ साली दलित एक्य घडविण्याचा प्रयत्न झाला, परंतु याच वर्षी केंद्रात मा. व्ही. पी. सिंग यांचे सरकार आले आणि महाराष्ट्रात एकत्रित रिपब्लिकन पक्षाने जनता दलात जावे कि कॉंग्रेस सोबत जावे, या मतभेदावरून रिपब्लिकन ऐक्य फुटले. एक गट कॉंग्रेस सोबत तर बाळासाहेब आंबेडकरांचा भारिप जनता दलासोबत राहिला. १९९४ साली बाळासाहेब आंबेडकरांनी अनेक जाती-जमातीमधील नवख्या चेहऱ्यांना सोबत घेऊन बहुजन महासंघाची स्थापना केली. किनवट विधानसभेच्या निवडणुकीत पहिलाच विजय संपादन केला. महाराष्ट्रभर बहुजन महासंघाची लहर निर्माण झाली, पुन्हा एकदा रिपब्लिकन ऐक्याचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली. १९९८ साली एकत्रित रिपब्लिकन पक्ष कॉंग्रेसच्या सोबतीने उगवत्या सूर्याची निशाणी घेऊन लोकसभेच्या निवडणुका लढल्या अकोल्यातून बाळासाहेब आंबेडकर, अमरावतीतून रा. सु. गवई, चिमूर मधून प्रा. जोगेंद्र कवाडे आणि मुंबईतून रामदास आठवले हे चार खासदार लोकसभेत निवडून गेले. रिपब्लिकन पक्षाचा एक गट नेहमी कॉंग्रेसधार्जिणा राहिला तर बाळासाहेबांचा भारिप बहुजन महासंघ समाजवादी विचारसरणीच्या लहान-लहान पक्षांना सोबत घेऊन कॉंग्रेसला शह देण्याचा प्रयत्न केला.

२०१४ पासून मात्र भारतीय राजकारणात भाजप आणि कॉंग्रेस हे दोनच पक्ष मित्र पक्षांना सोबतीला घेऊन राजकारण करू लागले पण या दोघांचीही विचारसरणी मान्य नसलेला प्रचंड मोठा

समूह उपेक्षित राहिला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी बाळासाहेब आंबेडकर यांनी उपेक्षितांना सोबत घेऊन ‘ वंचित बहुजन आघाडी ’ नावाचा राजकीय पक्ष स्थापन केला आणि पहिल्याच निवडणुकीत ४१ लाख मते मिळवून राजकारणात दरारा निर्माण केला. वंचितांच्या सत्तेत जाण्याच्या आशा पल्लवित झाल्या.

वंचित घटकांच्या उन्नतीसाठी अकोला जिल्हा परिषदेमध्ये बाळासाहेब आंबेडकर यांनी वंचितांच्या सत्ता संपादनाचा नवा अकोला पॅटर्न निर्माण केला आणि वंचित समूहामध्ये राजकारणाविषयी नवी जागृती निर्माण केली. भारताचे संविधान हाच आमचा जाहीरनामा आहे. ही घोषणा करून ॲड. बाळासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मुल्यांवर आधारित राजकारण करीत वंचित समूहाच्या सहभागातून भारतीय संसदीय लोकशाहीची पाळेमुळे बळकट करण्याचा प्रयत्न करत होते.

आजच्या व्यक्तिकेंद्रित, एकहाती राजकारणाला शह देण्याचा बाळासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न लोकशाहीच्या हिताचा व भारतीय प्रजासात्ताक सशक्त करणारा दिसून येतो त्यामुळे ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळीचा एकत्र अभ्यास करून एक ऐतिहासिक दस्तऐवज निर्माण करणे वंचितांच्या सत्ता सहभागासाठी गरजेचे आहे.

१. संशोधन विषयाची निवड :

१९८० पासून महाराष्ट्राच्या राजकारणात एक सशक्त राजकीय नेतृत्व म्हणून वाटचाल करीत असलेल्या नेतृत्वाच्या सामाजिक चळवळीचा व राजकीय स्थित्यंतराचा संशोधनात्मक अभ्यास होणे व ते समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, म्हणून प्रस्तुत संशोधकाने ‘ ॲड. प्रकाशराव उर्फ बाळासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीचा ऐतिहासिक अभ्यास ’ हा विषय निवडलेला आहे.

२. संशोधन विषयाची गृहीतके :

१. ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

२. ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्षेत्रात महिलांसाठी, कामगारांसाठी, मजुरांसाठी, नोकर वर्गासाठी अनेक चालवली चालवत आहेत.

३. ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे भारतीय राजकारणात लोकशाही केंद्रीभूत मानून राजकारण करणारे राजकीय नेतृत्व आहे.

४. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीत अनेक स्थित्यंतरे आलेली दिसून येतात.

५. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चळवळीत सामान्य जनांचा विचार केला जातो.

२. संशोधनाची उद्दिष्टे :

१. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रभावाचा अभ्यास करणे.

२. ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्षेत्रात कोणत्या चालवली चालवीत आहेत याचा शोध घेणे.

३. ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे भारतीय राजकारणातील लोकशाही केंद्रीभूत मानून राजकारण करणारे नेतृत्व आहे याचा शोध घेणे.

४. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीत आलेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करणे.

५. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चळवळीत सामान्य शोषित, वंचित जनांसाठी केलेल्या विचारांचा शोध घेणे.

३. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे एक व्यापक नेतृत्व आहे. अखिल भारतीय पातळीवरून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्षम नेतृत्व करीत आहेत ही त्यांच्या कार्याची व्याप्ती आहे. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीचा ऐतिहासिक अभ्यास करणे मुख्य हेतू आहे, म्हणजेच ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या एकूण कामगीरीपैकी केवळ सामाजिक व राजकीय कामगीरीचाच या प्रबंधात अभ्यास करण्यात येणार आहे.

ही या विषयाची मर्यादा आहे. पुढील तीन वर्षात हे संशोधन कार्य पूर्ण करण्याचा संशोधक प्रयत्न करणार आहे.

४. संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी अनुसूची, प्रश्नावली व संदर्भ संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

५. तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचे संकलन करण्यात येईल. अनुसूची व प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करण्यात येईल व विश्लेषण करण्यात येईल. प्रबंधाच्या मांडणीसाठी काही दुय्यम साधनांचाही आधार घेण्यात येईल, ज्यात ग्रंथ, पुस्तिका, विशेषांक, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे या सर्वांचा आधार घेण्यात येईल.

६. प्रकरणांची मांडणी :

१. प्रस्तावना :

१.१ या प्रकरणात प्रस्तुत संशोधन कार्याविषयीची भूमिका मांडण्यात येईल तसेच संशोधन पद्धतीसुद्धा मांडण्यात येईल.

१.२ संबंधित साहित्याचा आढावा.

२. प्रकरण दुसरे :

या प्रकरणात ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचा अल्प परिचय देण्यात येईल.

३. प्रकरण तिसरे :

या प्रकरणात ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास करण्यात येईल.

४. प्रकरण चौथे :

या प्रकरणात ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चळवळीचा अभ्यास करण्यात येईल.

५. प्रकरण पाचवे :

संशोधनाअंती काढण्यात आलेले निष्कर्ष आणि सारांश प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येईल.

६. संदर्भ साधने :

१. आगलावे प्रदीप - सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर २०००.

२. आठवले सदाशिव - इतिहास लेखन शास्त्र.

३. गायकवाड आर. डी., डॉ. सरदेसाई बी. एन., डॉ. हनमाने व्ही. एन. - इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९६.

४. डॉ. कौठेकर शांता - इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००७.

५. डॉ. देव प्रभाकर - इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड १९९७.

६. डॉ. सरदेसाई बी. एन. - इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५.

अ. ॲड. बाळासाहेब आंबेडकर - आंबेडकरी चळवळ संपली आहे.

ब. ॲड. बाळासाहेब आंबेडकर - अंधेर नागरी चौपट राजा.

क. ॲड. बाळासाहेब आंबेडकर - महाराष्ट्राचा उद्याचा मुख्यमंत्री वारकरीच.

ड. ॲड. बाळासाहेब आंबेडकर - ऐतिहासिक आंबेडकर भवनाचा वारसा आपण जपणार कि नाही ?

इ. उमेश चव्हाण - प्रकाशपर्व

ई. भीमराव आंबेडकर - पाक्षिक प्रबुद्ध भारत, संपादक.

उ. विलास वाघ (संपादक) - रिपब्लिकन खासदाराकडून दलित जनतेच्या अपेक्षा.

ऊ. सचिन कांबळे - बौद्ध भारत त्रैमासिक : विधानसभा निवडणूक २०१९ विशेषांक संपादक, ऑगस्ट - सप्टेंबर - ऑक्टोबर २०१९.

मार्गदर्शक	संशोधक
प्रा. डॉ. शेटोड साईनाथ नारायण	गायकवाड गणपत धोंडीबा

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर. **जिल्हा परिषद हायस्कूल, माळकौठा.**